महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये
प्राप्त झालेले व्दितीय अपील

**अपील क्रमांक : १३३५/२०२१**

**अपिलार्थी, श्री. दिनेश दिलदार वासनिक**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक व्यवस्थापक,**
वन प्रकल्प विभागीय कार्यालय, भंडारा,
नॅशनल हायवे क्रं. ६, रेल्वे क्रॉसिंग जवळ, ता. जि. भंडारा-४४१९०४

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय व्यवस्थापक,**
वन प्रकल्प विभागीय कार्यालय, भंडारा,
नॅशनल हायवे क्रं. ६, रेल्वे क्रॉसिंग जवळ, ता. जि. भंडारा-४४१९०४

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १०.०४.२०२३**

**अपीलकर्ता : अनुपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २३.०९.२०२० | २९.०९.२०२० | १२.११.२०२० | १५.०२.२०२१ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी, यांच्याकडे **दिनांक २३.०९.२०२०** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " सन २०१९ ते २०२० पावेतो, वनप्रकल्प विभाग भंडारा अंतर्गत येत असलेल्या लाखनी कार्यक्षेत्र व सोनेगाव/चंद्रगुर कार्यक्षेत्रातील सन २०१९ ते २०२० या सत्रात साग रोपवन लागवड, विडींग पालवी पोरका, मरळणी, ओ.डब्लु.आर. बांबु विरळग, या कामावर लावलेल्या रोंजदारी मजुरांची नावे व पत्यासहित आज पर्यंतची माहिती देण्यात यावी " याबाबत माहिती मागीतलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २९.०९.२०२० रोजीच्या पत्रान्वये, सदरची माहिती विहित प्रपत्रात उपलब्ध नसल्यामुळे आपणांस या विभागातर्फे सदरची माहिती लिखीत उपलब्ध करुन देणे शक्य होणार नाही. त्यामुळे आपण कोरोना विषाणुचा प्रार्दुभाव कमी झाल्यानंतर प्रत्यक्षात जन माहिती अधिकारी यांचेशी भेट घालुन आवश्यक असलेली माहिती

गोळा करावी, असे सुचित केले. त्यानंतर अपिलार्थी यांनी **दिनांक १२.११.२०२०** रोजी कलम १९ (१) नुसार प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे " माहिती न दिल्यामुळे " असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी १५.०२.२०२१ रोजी सुनावणी घेवून, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक व्यवस्थापक, वप्रवि भंडारा यांनी मांडलेली बाजुचे कथन केल्यानंतर अपिलार्थी यांनी दिनांक २५.०२.२०२१ रोजी कार्यालयीन वेळेत कार्यालयात उपस्थित राहुन संबंधीत कक्षाकडुन हवी असलेली माहिती संकलित करावी, असे आदेशीत केले.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक १५.०६.२०२१** रोजी " जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचेकडून माहिती अपूर्ण मिळाल्यामुळे " असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक **१०.०४.२०२३** रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी अनुपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक व्यवस्थापक श्रीमती डी. बी. राऊत उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभागीय व्यवस्थापक श्री. बी. एन. स्वामी उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास आले की, अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने, जन माहिती अधिकारी यांनी सदरची माहिती विहित प्रपत्रात उपलब्ध नसल्यामुळे आपणांस या विभागातर्फे सदरची माहिती लिखीत उपलब्ध करुन देणे शक्य होणार नाही. त्यामुळे आपण कोरोना विषाणुचा प्रार्दुभाव कमी झाल्यानंतर प्रत्यक्षात जन माहिती अधिकारी यांचेशी भेट घालुन आवश्यक असलेली माहिती गोळा करावी, असे सुचित केले. तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी हे वारंवार माहितीचे अर्ज दाखल करीत असुन, कार्यालयीन कामात अडथळा निर्माण करुन वेळ वाया घालवत असल्याचे आढळुन येते. त्या विरुध्द अपिलार्थी यांनी दिनांक १२.११.२०२० रोजी प्रत्यक्षात माहिती अप्राप्त असल्याचे नमुद करीत प्रथम अपील अर्ज दाखल केला. त्यावर दिनांक १५.०२.२०२१ रोजी सुनावणी घेवून, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक व्यवस्थापक, यांनी याआधीच योग्य तो प्रतिसाद दिला असुन, वरील माहिती प्राप्त करुन घेण्यास अपिलार्थीस स्वारस्य असल्याने दिनांक २५.०२.२०२१ रोजी कार्यालयीन वेळेत कार्यालयात उपस्थित राहुन संबंधीत कक्षाकडुन हवी असलेली माहिती संकलित करण्याबाबत सुचित केले.

त्या विरुध्द अपिलार्थी यांनी दिनांक १५.०६.२०२१ रोजी द्वितीय अपील अर्ज दाखल केला. मात्र अपिलार्थी यांना अपेक्षित असणारी माहिती प्रदान करण्याबाबत जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय

अधिकारी यांनी दोन्ही स्तरावर माहिती देण्याबाबत सकारात्मक भुमिका घेतली असुन, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती ही उपलब्ध नसल्याने प्रत्यक्षात अवलोकन घेणे सुचित केले. त्याविरुध्द वरील माहिती प्राप्त करुन घेण्यास त्यांना स्वारस्य असल्याने संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क साधुन अवलोकनार्थ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेली संधी पुन:श्च एकदा प्रदान करण्यात येत आहे. असे निर्देशीत करुन प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १०.०४.२०२३**

जावक क्रमांक 577 दिनांक -5 FEB 2024